**संचालनालय, लेखा व कोषागारे विभागाच्या अधिनस्त कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांनी IGOT डिजिटल प्रशिक्षण प्लॅटफॉर्मवरील ०५ कोर्स पूर्ण करणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**संचालनालय, लेखा व कोषागारे,**
**कस्तुरी इमारत, तळमजला, ज. टाटा मार्ग, पेट्रोलियम हाऊसच्या समोर,**
**चर्चगेट, मुंबई- ४०००२०**

परिपत्रक क्रं. संलेको/IGOT -०५-Course/०३-२०२५-०३/ ११० दि. 11 SEP 2025

**वाचा:-**

१. सामान्य प्रशासन विभागाचे अ.शा.पत्र क्रं. प्रशिक्षण २०२४/प्र.क्र.९२/प्रशि-४ दि.१०/०३/२०२५
२. संचालनालयाचे परिपत्रक क्रं. संलेको/IGOT -०५-Course/०३-२०२५/३० दि.१३/०३/२०२५
३. संचालनालयाचे परिपत्रक क्रं. संलेको/IGOT -०५-Course-/०३-२०२५-०२/५२ दि.०२/०५/२०२५

**-: परिपत्रक :-**

१०० दिवसाच्या कार्यक्रमांतर्गत आपल्या विभागातील व विभागाच्या अधिनस्त कार्यालयातील सर्व शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी IGOT प्रणालीवर उपलब्ध प्रशिक्षणापैकी ५ प्रशिक्षणे (३ General Courses व २ विभागाच्या विषयाशी संबंधित Domain Courses) पूर्ण करण्याबाबत संचालनालयाचे दि. ०२/०५/२०२५ रोजीच्या परिपत्रकानुसार सूचित करण्यात आले होते.

तथापि बहुतांशी अधिकारी/कर्मचाऱ्यांनी सदर प्रशिक्षण सुरु केल्याचे देखील दिसून येत नाही. तसेच काही अधिकाऱ्यांनी ५ पेक्षा कमी प्रशिक्षणे पूर्ण केल्याचे दिसते. ही बाब समर्थनीय नाही.

तरी या परिपत्रकाद्वारे पुनश्च सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांना IGOT प्रणालीवरील कमीत कमी ५ प्रशिक्षणे पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. सदर प्रणालीवर लॉगिन करण्यासाठीची Link व Process Flow यासोबत जोडण्यात आला आहे. सर्व विभागीय तसेच जिल्हास्तरीय कार्यालय प्रमुख यांनी त्यांच्या कार्यालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी हे विहित संख्येपर्यंतची प्रशिक्षणे पूर्ण करतील याची दक्षता घेऊन तसा अहवाल तातडीने संचालनालयास पाठवावा.

**(दीपा देशपांडे)**
**संचालक**
**लेखा व कोषागारे,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

**प्रति:-**


१. सहसचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. सहसचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
३. सहसंचालक,लेखा व कोषागारे पुणे/नाशिक/नागपूर/अमरावती/छत्रपती संभाजीनगर /कोकण विभाग
४. अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई
५. श्री. हेमंत श्रीमंत जाधवर, MDO Leader (क्षेत्रीय कार्यालय-igot Platform), उपसंचालक (प्रणाली विश्लेषक), राज्य अभिलेख देखभाल अभिकरण कार्यालय, मुंबई
६. सर्व कोषागार अधिकारी
७. सहायक संचालक (प्रशिक्षण), पुणे/नाशिक/नागपूर/अमरावती/छत्रपती संभाजीनगर /कोकण विभाग

Login Link > https://igotkarmayogi.gov.in/#/

Click the Below Mentioned Home Page Link for Login

https://igotkarmayogi.gov.in/#/

Main Page




Login Page

(Login with OTP)

